# मुख्यमंत्री रोजच्या रोज काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे कौतुक करू लागले आहेत

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडे**

केंद्रात पुन्हा भाजपाची सत्ता आणायची आणि नंतर सत्ता आणताना अशा प्रचंड बहुमताने आणायची की, सर्व मित्रपक्षांना लाथाडता येईल यासाठी दिल्लीपासून गल्लीपर्यंत आटापिटा सुरू आहे. महाराष्ट्रात भाजपाचे सर्वाधिक खासदार व्हावे यासाठी देवेंद्र फडणवीस, गिरीश महाजन आणि चंद्रकांत पाटील इतके बेभान झाले आहेत की, ते नकळत रोजच्या रोज भाजपाचे गुणगान गाण्याऐवजी राष्ट्रवादी आणि काँग्रेसचे कौतुक करीत सुटले आहेत. आता इतकी वेळ आली आहे की मतदारांना हे कळेनासे होणार आहे की आपण भाजपाला मतदान करीत आहोत की कमळ हाती घेतलेल्या राष्ट्रवादी-काँग्रेसला मतदान करीत आहोत? जे चालले आहे ते सगळेच बुचकाळ्यात टाकणारे आहे.

भाजपाचा जन्म होऊन ३८ वर्षे झाली. म्हणजे हे पोर काही लहान राहिले नाही. श्यामच्या आईलाही मागे टाकेल असे संघाचे सुसंस्कार करून नितीमत्तेच्या आणि जनसेवेच्या आंघोळी घालून या सर्वांना भाजपात धाडण्यात आले. राजकारणात अशोक चव्हाणांचा 'आदर्श' नको तर संघाच्या आदर्श मूर्ती हव्या या इच्छेने संघ आणि जनसंघाने १९५१ पासून कितीतरी वर्षे खर्ची घातली आणि नवा भारत निर्माण करण्यासाठी आपले सैन्य तयार करून राजकारणात उतरविले. पण आता तेच गोंधळात पडले आहेत. त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले होते ते आपल्याला नीट समजले की नाही हेच त्यांना कळेनासे झाले आहे. म्हणजे आपली काही भावंडे ही वाईट आहेत, ही भावंडे कौरवांसारखी आहेत हे ऐकत मोठ्या झालेल्या या पांडवांना तीच भावंडे आपल्याच घरात आनंदाने नाचताना बागडताना दिसू लागली आहेत. त्यामुळे आपण जे कौरव वगैरे शब्द ऐकले ते ऐकलेच नव्हते की काय असा त्यांना संभ्रम वाटू लागला आहे.

२०१४ सालच्या निवडणुकीत भाजपाने काँग्रेसमुक्त भारत आणि राष्ट्रवादीच्या काका-पुतण्याचा सर्वनाश करायचे असे मार्गदर्शन प्रत्येक बैठकीत दिले. काँग्रेसमुक्त म्हणजे केवळ काँग्रेसचे आणि राष्ट्रवादीचे झेंडे आणि चिन्ह असलेल्या पताका फाडायच्या इतकाच त्याचा अर्थ नाही हे त्यांना कळले. आपल्याला जे मार्गदर्शन मिळाले त्याचा अर्थ काँग्रेस आणि राष्ट्रवादीची धोरणे, त्यांच्या नेत्यांची मानसिकता आपल्याला उखडून टाकायची आहे असा त्यांचा समज झाला. या समजामुळेच ते आता भांबावून गेले आहेत. कारण काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या ज्या धोरणांचा आणि मानसिकतेचा विरोध करण्यास आपल्याला सांगितले त्याच धोरणांनी आणि नितिमत्तेने मोठे झालेले नेते भाजपात वाजतगाजत आणले जात आहेत. म्हणजे आपले मुख्यमंत्री फडणवीस, त्यांचे खास सौदागर गिरीश महाजन आणि संघाचे अपत्य असलेले चंद्रकांत पाटील रोज जेव्हा काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या एका नेत्याला आपल्याकडे घेतात तेव्हा त्या नेत्याच्या इतिहासाचेच कौतुक होताना दिसते. आपल्याला बाजूला सारून त्यांना पायघड्या घालत मंत्रिपदाचे आश्वासन देत आणले जात आहे याचा अर्थ जनतेवर त्यांची पकड जास्त आहे, तेच जिंकून येण्याची शक्यता जास्त आहे, त्यांच्याकडे पैसे जास्त आहेत, आपल्यापेक्षा ते जास्त बलवान आहेत असा अर्थ होतो. मग चुकले कुणाचे?



आपल्याला चिंतन बैठकांतून मिळालेले बाळकडू चुकले की त्यांना मिळालेले बाळकडू चुकले? आपण काँग्रेसची धोरणे आणि नीती राबवलेले नेते आपल्या पक्षात घेऊन त्यांना एकेका जिल्ह्यांचे नेतृत्त्व देत आहोत तर मग ज्यातून ते इतके ताकदवान झाले ती काँग्रेसची धोरणे व नीती चुकीची आहेत असे आपल्याला प्रबोधन का केले? राष्ट्रवादीच्या काका-पुतण्याचे राजकारण जसे आहे तसे करणाऱ्या नेत्यांना आपल्या पक्षात घेऊन त्यांना जिल्ह्यांचे नेतृत्त्व देत आहोत तर मग काका-पुतण्याचे राजकारण चुकीचे आहे असे आपल्याला प्रबोधन का केले?

रोजचा भाजपातील नवा प्रवेश पाहून भाजपावाल्यांना असे वाटू लागले आहे की, आपण बहुदा दिवस-दिवस आणि तासन्‌तास बैठकीची प्रबोधनं ऐकून ऐकून कंटाळून झोपलो होतो. त्यामुळे चिंतनातील वाक्यांचा खरा अर्थ आपल्याला समजलाच नाही. आपल्याला काँग्रेसची धोरणे आणि नीती आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राजकारण नष्ट करायला सांगितलेच नव्हते. आपल्याला फक्त हाताचे चिन्ह असलेले बॅनर आणि पताका उतरवायला सांगितल्या होत्या. राष्ट्रवादीचे घड्याळ दिसू द्यायचे नव्हते. बस्स, चेहरे तेच ठेवायचे, घोषणा तशाच राहू द्यायच्या, फक्त हातात कमळ द्यायचे, आपल्याला इतकेच काम आहे याची खात्री पटू लागली आहे.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट आहे. भाजपात आल्यावर वाल्याचा वाल्मिकी होतो असे सांगतात. पण एक फोटो दृष्टीसमोरून हलत नाही. पंतप्रधान मोदींच्या खांद्यावर हात टाकायची हिंमत अमित शहातही नाही. पण या वाल्मिकीच्या खांद्यावर मुकेश अंबानी यांनी हात टाकला होता. रामायणात जे घडले ते घडले, आताचे वर्तमान वेगळेच संदेश देते आहे.